- प्रेस नोट - दि.२०/११/२०१९.

| | अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | संतोष बाबू नांदोसकर, सपोफौ/८०४, मालवण पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस दुरक्षेत्र मसुरे, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७००/-रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७००/-रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे माळगाव बागायत, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथे देशी दारुचे दुकान ( लायसन्स नंबर ४५ ) आहे. सदरचे दुकान हे ड्राय डे च्या दिवशी तक्रारदार पुर्णपणे बंद ठेवीत असतात. परंतु आलोसे नांदोसकर यांनी तक्रारदार यांना प्रत्येक ड्राय डे च्या दिवसाचे ७००/- रुपये दयावे लागतील असे सांगीतले, नाहीतर ड्राय डे च्या दिवशी दारुची विक्रि करीत असल्याबाबतची खोटी केस दाखल करीन अशी भिती दाखवुन दिनांक ०८/११/२०१९ रोजी च्या ड्राय डे करीता ७००/- रु. लाच रक्कमेची मागणी केली वगैरे मजकूरची तक्रार तक्रारदार यांनी दि.०७/११/२०१९ रोजी स्वहस्ताक्षरात दिली.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.०८/११/२०१९, दि. १२/११/२०१९ व दि. १४/११/२०१९ रोजी केलेल्या पडताळणीत आलोसे नांदोसकर यांनी ७००/- रूपयाची मागणी केली असता त्यांचे विरुध्द पोलीस दुरक्षेत्र मसुरे च्या इमारती मध्ये सापळा आजमावला असता आलोसे नांदोसकर यांनी तक्रारदार यांचे कडून ७००/-रु. लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना दि. १९/११/२०१९ रोजी १५.२२ वाजता रंगेहात पकडण्यात आले.<br>वरील कारवाई पोलीस उप अधीक्षक असीबी सिंधुदूर्ग श्री.कांबळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नितीन कुंभारी यांचेकडून करण्यात आलेली आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, सिंधुदुर्ग विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग यांचे कार्यालय, कुडाळ,ता.कुडाळ**
**टोल फ्री नंबर:-१०६४,**
**दुरध्वनी क.०२३६२-२२२२८९**

पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो सिंधुदुर्ग

Scanned by CamScanner